पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - १८
आरोग्य मुख्य कार्यालय
ई-मेल – healthho@pcmcindia.gov.in वेबसाईट – www.pcmcindia.gov.in
दुरध्वनी क्र. – ०२०-६७३३३३३३ विस्तारित क्र. - १११८

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अस्थायी आस्थापनेवरील गट "क" मधील खालील पदे फक्त ६ महिने कालावधीकरीता दरमहा एकत्रित मानधनावर तात्पुरत्या स्वरुपात भरावयाची आहेत.

| अ.क्र. | पदनाम | पदसंख्या |
|---|---|---|
| १ | निरिक्षक(आरोग्य निरीक्षक दर्जा) | १६ |
| २ | आरोग्य सहाय्यक | १६ |

वरीलप्रमाणे नमुद सवर्गातील पदे भरणेबाबतची सविस्तर जाहिरात, अर्हता, आरक्षणाचा तपशील, अटी शर्ती, आवश्यक तसेच त्याअनुषंगाने इतर सर्व आवश्यक माहिती पिंपरी चिंचवड महापालिकेच्या **www.pcmcindia.gov.in** या संकेतस्थळावरील नोकरीविषयक या सदरामध्ये उपलब्ध करुन देणेत आलेली आहे. त्यानुसार तरी **इच्छुक उमेदवारांनी विहित अर्जासह Walk in Interview करिता दिनांक ०९/०६/२०२३ रोजी स.१०:०० वा. दिवंगत मधुकर पवळे सभागृह, ३ रा मजला, पिंपरी चिंचवड महानगरपालिका मुख्य इमारत, पिंपरी-४११ ०१८ येथे मुळ कागदपत्रांसहित उपस्थित रहावे. तसेच आलेल्या उमेदवारांची नोंदणी मुलाखतीच्या दिवशी सकाळी १०.०० ते ११.०० या वेळेत केले जाईल, वेळेनंतर आलेल्या उमेदवांराची नोंदणी केली जाणार नाही.**

(शेखर सिंह)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८

जाहिरात क्रमांक – 9/2023-24
वेबसाईट – **www.pcmcindia.gov.in**
क्र. आमुका/०१/कावि/509/२०२३
दि.२६/०५/२०२३

(विनोद जळक)
सहा आयुक्त, आरोग्य विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - १८
आरोग्य मुख्य कार्यालय
ई-मेल – healthho@pcmcindia.gov.in वेबसाईट – www.pcmcindia.gov.in
दुरध्वनी क्र. – ०२०-६७३३३३३३ विस्तारित क्र. - १११८


जाहिरात क्र. ९/२०२३–२४

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आरोग्य विभागातील अस्थायी आस्थापनेवरील खालील नमूद केलेली पदे करार पध्दतीने दरमहा एकत्रित मानधनावर फक्त ६ महिने कालावधीकरीता तात्पुरत्या स्वरुपात भरावयाची आहेत. त्याबाबत पदसंख्या, एकत्रित मानधन व आरक्षण खालीलप्रमाणे :-

| अ. क्र. | पदनाम | पद संख्या | दरमहा एकत्रीत मानधन रक्कम रुपये | सामाजिक आरक्षण | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | अनु. जाती | अनु. जमाती | वि.जा (अ) | भ.ज (ब) | भ.ज (क) | भ ज (ड) | वि मा प्र | इ मा व | आ दु घ | खुला |
| १ | निरिक्षक (आरोग्य निरिक्षक दर्जा) | १६ | २७००० | २ | १ | १ | - | १ | - | - | ३ | २ | ६ |
| २ | आरोग्य सहाय्यक | १६ | २६००० | २ | १ | १ | - | १ | - | - | ३ | २ | ६ |
| एकूण | | ३२ | | | | | | | | | | | |

१.१ वरील प्रवर्गनिहाय पदसंख्या व आरक्षण यामध्ये बदल होण्याची शक्यता असून त्याबाबतचे सर्व अधिकार मा. आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना राहतील.

२. वयोमर्यादा :-

२.१ उपरोक्त गट क मधील पदांसाठी सर्व प्रवर्गातील उमेदवारांचे वय जाहिरातीच्या दिनांकास किमान १८ वर्षे पूर्ण असणे आवश्यक राहील. तसेच खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ३८ वर्षे व मागास प्रवर्गातील उमेदवारांसाठी ४३ वर्षे इतकी राहील.

३. शैक्षणिक अर्हता :-

| अ.क्र | पदनाम | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|
| १ | निरिक्षक | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी असणे आवश्यक.<br>२) शासनमान्य संस्थेकडील आरोग्य निरिक्षक (Sanitary Inspector) पदविका उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>३) शासकीय अथवा निमशासकीय संस्थांमधील समकक्ष पदाच्या कामाचा किमान ६ महिन्यांचा अनुभव आवश्यक.<br>४) मान्यता प्राप्त शासन संस्थेकडील संगणक अर्हता आवश्यक<br>५) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक |
| २ | आरोग्य सहाय्यक | १) उच्च माध्यमिक शालांत परिक्षा (एच.एस.सी.)असणे आवश्यक<br>२) शासनमान्य संस्थेकडील आरोग्य निरिक्षक (Sanitary Inspector) पदविका उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>३) शासकीय अथवा निमशासकीय संस्थांमधील समकक्ष पदाच्या कामाचा किमान ६ महिन्यांचा अनुभव आवश्यक.<br>४) मान्यता प्राप्त शासन संस्थेकडील संगणक अर्हता आवश्यक<br>५)मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक |

अर्ज स्विकारणे विषयक माहिती

तरी इच्छुक उमेदवारांनी **Walk in Interview** करिता दिनांक ०९/०६/२०२३ रोजी स.१०:०० वा. दिवंगत मधुकर पवळे सभागृह, ३ रा मजला, पिंपरी चिंचवड महानगरपालिका मुख्य इमारत, पिंपरी-४११ ०१८ येथे मुळ कागदपत्रांसहित उपस्थित रहावे. तसेच आलेल्या उमेदवारांची नोंदणी मुलाखतीच्या दिवशी सकाळी १०.०० ते ११.०० या वेळेत केले जाईल, वेळेनंतर आलेल्या उमेदवांराची नोंदणी केली जाणार नाही.

४. अटी व शर्ती

१) करार पध्दतीने मानधनावरील नेमणुका फक्त ६ महिने कालावधीसाठी तात्पुरत्या हंगामी स्वरुपाच्या आहेत.

२) करार पध्दतीने नियुक्ती फक्त सहा महिने कालावधीसाठी देण्यात आल्यामुळे संबंधितांस महानगरपालिकेच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशाबाबत किंवा सामावून घेण्याबाबत व नियमित सेवेचा इतर कोणताही लाभ मिळण्याचा अधिकार नसेल, तसेच ६ महिने नेमूणक कालावधी पूर्ण झाल्यानंतर पुनश्च नेमणूक मिळणार नाही याबाबत अर्जदाराने र.रु. १००/- च्या स्टॅम्पपेपरवर हमीपत्र लिहून देणे बंधनकारक राहील.

३) **Walk in Interview** येण्या-जाण्याकरीता उमेदवारास कोणत्याही प्रकारचा भत्ता दिला जाणार नाही.

४) अर्जासोबत सादर केलेला अनुभवाचा दाखला खोटा असल्याचे निदर्शनास आल्यास तो अनुभव ग्राह्य धरला जाणार नाही. व भरती प्रक्रियेतुन अपात्र करण्यात येईल.

५) सर्व उमेदवारांनी **Walk in Interview** उपस्थित राहताना शैक्षणिक अर्हता, जातीचे प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र व अनुभवाबाबतच्या आवश्यक त्या मुळ प्रती व साक्षांकित केलेल्या सत्य प्रती उदा. गुणपत्रिका (मार्कशीट) सर्टीफिकेट, फोटो, इतर कागदपत्रे सादर करणे बंधनकारक आहेत.

६) उमेदवार निवडीकरीता खालीलप्रमाणे निकष असेल.

७) **Walk in Interview** सर्व उमेदवारांची सर्व साधारण गुणवत्ता यादी वेब पोर्टलवर प्रसिध्द करण्यात येईल.

८) वरील पदांना मागासवर्गीयांचे आरक्षण लागू राहील.

९) उमेदवारांना कार्यालयीन कामकाजाच्या वेळा पाळणे बंधनकारक राहील. त्यामध्ये कोणतीही सवलत अनुज्ञेय नाही.

१०) उमेदवारांची नेमणूक झालेनंतर बायोमेट्रीक पध्दतीने हजेरी नोंदविणे बंधनकारक राहील व हजेरी मस्टरवर रोजचे रोज स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. त्याशिवाय मानधन अदा केले जाणार नाही.

११)नियुक्ती प्राधिकारी म्हणून मा. आयुक्त यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचा अधिकार राहील.

१२)करार पध्दतीने नियुक्त झालेल्या उमेदवाराचे नेमून दिलेले काम समाधानकारक नसल्यास कोणतेही सबळ कारण न देता त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.

१३)करार पध्दतीने नियुक्त झालेल्या उमेदवारास सेवाकालामध्ये काही आजार उद्भवल्यास त्यास कार्यालय बांधील राहणार नाही.

१४)करार पध्दतीने नियुक्त झालेल्या उमेदवाराने नियुक्तीच्या ठिकाणी नियुक्ती आदेश निर्गमित झालेल्या दिनांकापासून आठ दिवसाच्या आत रुजू होणे बंधनकारक राहील अन्यथा सदर नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल.

१५)करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्ती सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल अशा व्यावसायिक कामात गुंतलेली नसावी तसेच त्यांना प्राप्त होणा-या कागदपत्रे/ माहिती व आधारसामुग्री बाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील.

१६)निवड झालेल्या उमेदवारांस एकत्रित मानधनाव्यतिरिक्त अन्य कोणत्याही सोयी सुविधा, हक्क व इतर आर्थिक लाभ देय राहणार नाही.

१७)मानधनावरील उमेदवारांना चार किरकोळ रजा, एक साप्ताहिक सुटटी देय राहील.

१८)अर्जदाराने अर्ज केला अथवा विहीत अर्हता धारण केली म्हणजे नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार पात्रता धारण न करणारा, गैरवर्तन करताना/ दबावतंत्राचा वापर करताना आढळल्यास त्याची उमेदवारी/ निवड रद्दबातल करण्यात येईल तसेच नियुक्ती झाल्यासही कोणतीही पुर्वसूचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

१९)अपात्र ठरलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

२०)मनपा सेवेत असताना उमेदवाराच्या चुकीमुळे मनपाचे कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्यास त्याची भरपाई करुन घेणेत येईल.

२१)कागदपत्रांची तपासणी करताना जे उमेदवार शैक्षणिक अर्हता धारण करीत नाही, इतर आवश्यक बाबींची पूर्तता करीत नाहीत आणि कागदपत्रे तपासणीचे वेळी अपूर्ण कागदपत्रे सादर करतील त्यांना निवडीसाठी अपात्र ठरविण्यात येईल. यापुर्वी निवड झालेल्या उमेदवारांना पुन्हा त्याच पदासाठी संधी देण्यात येणार नाही.

२२)अर्जदारांना आपल्या वैयक्तिक माहितीत त्याचा ई-मेल पत्ता व मोबाईल क्रमांक देणे बंधनकारक आहे.

२३)उमेदवारांची यादी, निवेदने, निवड व प्रतिक्षा यादी व इतर सूचना हया वेळोवेळी www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील. त्याबाबत उमेदवारांना लेखी पत्रव्यवहार/एसएमएस केला जाणार नाही. त्यामुळे उमेदवारांनी भरतीप्रक्रीया पूर्ण होईपर्यंत वेळोवेळी संकेतस्थळावरील सूचना पहाव्यात. संकेतस्थळावरील सूचना पाहिल्या नाहीत या कारणास्तव आलेल्या कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही. तसेच याबाबत उमेदवारांने समक्ष महापालिका कार्यालयामध्ये येवून विचारणा करू नये.

(शेखर सिंह)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११०१८

जाहिरात क्रमांक – ७/२०२३-२४
वेबसाईट – www.pcmcindia.gov.in
क्र. आमुका/०१/कावि/५००/२०२३
दि.२६/०५/२०२३

(विनोद जळक)
सहा आयुक्त, आरोग्य विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८

## उमेदवाराने करावयाचा अर्जाचा नमूना

Passport size photo

प्रति,
मा. आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८

विषय – करार / मानधन पध्दतीने भरावयाच्या ...................... या पदासाठी अर्ज
संदर्भ – आरोग्य मुख्य कार्यालयाकडील जाहिरात क्र. ........... दि. ......../ /२०२३

महोदय,

संदर्भिय जाहिरातीनुसार मी मनपाच्या क्षेत्रिय कार्यालयातर्गत स्वच्छते विषयक कामकाजासाठी करार/ कंत्राटी/ मानधन पध्दतीने भरावयाच्या .......................................या पदासाठी आवश्यक ती अर्हता धारण करित असून या पदासाठी निवड होण्याकरिता विहीत नमुन्यातील अर्ज सादर करित आहे.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | संपुर्ण नाव – | आडनाव | स्वत:चे नाव | वडील / पतीचे नाव |
| २. | पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता – | | | |
| ३. | ईमेल आयडी – | | मोबाईल क्रमांक – | |
| ४. | लिंग – पुरुष – | स्त्री – | तृतीय पंथी – | (लिंगासमोरील चौकटीमध्ये टीक मार्क करावे.) |
| ५. | सद्यस्थितीत महापालिकेत **कामकाज करित** आहे **काय** - | | | |

६. जात –

| SC | ST | VJ-A | NT-B | NT-C | NT-D | OBC | SBC | EWS | OPEN | Other- |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|

७. **अर्जदाराने धारण केलेल्या शैक्षणिक अर्हतेचा तपशील –**

| अ.क्र | शैक्षणिक अर्हता | संस्था | उत्तीर्ण वर्ष | मिळालेले गुण / टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

८. **अनुभवाचा तपशील –**

| अ.क्र | संस्थेचे नाव | संस्थेचा पत्ता | पद | कालावधी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

वर नमुद केलेला तपशील खरा व बरोबर असून त्याबाबत आवश्यक कागदपत्रांच्या प्रमाणित सत्यप्रती सोबत जोडत आहे. मी असेही प्रमाणित करतो / करते की, वर दिलेली माहिती खोटी, बनावट वा चुकीची आढळल्यास या माहितीच्या आधारे नोकरीवरुन कमी करण्यास मी पात्र राहीन. तसेच माझ्याविरुध्द कायदेशीर कारवाई केल्यास माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

..................
(स्वाक्षरी)

(श्री/श्रीम..........................................)
(उमेदवाराचे नाव)

स्थळ – ...........................
दिनांक ......../ ......../२०२३

सहपत्रे – अर्जासोबत खालील प्रमाणपत्रांच्या प्रमाणित सत्यप्रती जोडणे आवश्यक आहे.

१. शैक्षणिक व इतर अर्हतेची प्रमाणपत्रे २. अनुभव प्रमाणपत्रे ३. जात वैधता प्रमाणपत्र ४. इतर आवश्यक कागदपत्रे